महाराष्ट्र वन विभाग
☎:०२२-२८६९२६६८/ २८६९२५९६
apccfwlmumbai@mahaforest.gov.in

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
वन्यजीव पश्चिम प्रदेश मुंबई
जुनी एम.एच.बी. कॉलनी, एल.टी.रोड, बोरीवली
(पश्चिम), मुंबई - 400091

जा.क्र.कक्ष-3/जमीन/FCA/प्र.क्र.121/ 1941 /2023-24 दिनांक: 15 /12/2023

## कार्यारंभ आदेश

विषय :- Diversion of 0.0728 Ha. Forest land for widening of existing Shri. Krishna Nagar Bridge near western Express Highway, Borivali, East in R/Central Ward. Municipal Corporation of Greater Mumbai.

संदर्भ :- 1) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग आदेश क्र. FLD-2015/प्र.क्र.77/फ-10, दि. 01/03/2017

2) केंद्र शासनाचे पत्र क्र. FC-I/MH-332/2023-NGP/12002, दि. 08/08/2023

3) Deputy Chief Engineer,(Bridges) Western Suburbs, Brihanmumbai Municipal Corporation's यांचेकडील पत्र क्र.Ch.E/11283,/Bridges dated,दि.07/12/2023

4) वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचेकडील पत्र क्र. कक्ष-2/जमीन/742,दि.07/11/2023

5) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कक्ष-3/जमीन/FCA/प्र.क्र.121/786, दि. 09/11/2023

विषयांकीत प्रकरणी संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत केंद्र शासनाने Diversion of 0.0728 Ha. Forest land for widening of existing Shri. Krishna Nagar Bridge near western Express Highway, Borivali, East in R/Central Ward. Municipal Corporation of Greater Mumbai बाबतच्या प्रस्तावास 1 ते 24 अटींचे अधीन राहून तत्वतः मान्यता प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी 1 ते 24 अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेकडून झाल्याचे खात्री करुन पूर्तता अहवाल संदर्भ क्र. 4 अन्वये या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवाल या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. 5 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना पाठविण्यात आलेला होता.

2.00 केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. एफ-11/306-214/एफसी दिनांक 07.05.2015 महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. एफएलडी-2015/प्र.क्र.-77/फ-10 दिनांक 01.07.2015 व महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. FLD-2015/प्रक्र.77/फ-10,दिनांक 01.03.2017 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत नवीन रस्ते करणे, अस्तीत्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन लाईन, पाण्याची पाईप लाईन, ऑप्टिकल फायबर केबल लाईन, रेल्वे लाईन इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर सदर तत्वतः मान्यतेच्या पत्रातील पर्यायी वनीकरणाची रक्कम, नक्त वर्तमान मूल्य रक्कम (NPV), वन्यजीव संवर्धन आराखडा, औषधी वनस्पतीचे रोपवन इत्यादी कामांबाबत आवश्यक पूर्ण देय रक्कम (Compensatory levies)

भरणा प्रकल्प यंत्रणेकडून केल्यानंतर तसेच आवश्यक त्या ठिकाणी पर्यायी वनीकरणासाठीची वनेत्तर जमीन वन विभागाकडे हस्तांतरण (Transfer) व वन विभागाचे नावे (Mutation) झालेनंतर प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू करून सुविधा उपलब्ध होण्याचे दृष्टीने प्रकल्पा अंतर्गत वन जमीनीवरील झाडे तोडण्यास तसेच काम सुरू करणेस परवानगी देणेसाठी संबंधित मुख्य वनसंरक्षक तसेच वन्यजीव विभागाच्या अखत्यारीतील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सदरचे काम सुरु करण्यास परवानगी देणेस हरकत नसून पुढील आदेश होणेबाबत प्रकल्प यंत्रणेने विनंती केली आहे.

3.00 प्रकल्प यंत्रणेने, पर्यायी वनीकरण, नक्त वर्तमान मूल्य, व वृक्षतोडीची रक्कम इ. रक्कमा विहित मार्गे कॅम्पा सदरी जमा केलेल्या आहेत. केंद्र शासनाचे दिनांक 07.05.2015. महाराष्ट्र शासनाकडील परिपत्रक क्र. एफएलडी-2015/प्रक्र-77/फ-10 दिनांक 01.07.2015 व महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. FLD- 2015/प्रक्र.77/फ-10, दिनांक 01.03.2017 अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून Deputy Chief Engineer,(Bridges) Western Suburbs, Brihanmumbai Municipal Corporation यांना विषयांकित काम सुरु करण्यासाठी खालील अटीं व शर्तीचे अधीन राहून कार्यारंभ आदेश (Working Permission) देण्यात येत आहे :-

1. प्रकल्प यंत्रणा वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत केंद्र शासनाचे तत्वत: मान्यता दिलेल्या आदेशातील सर्व अटींचे अनुपालन करेल.
2. प्रकल्प यंत्रणा तत्वतः मान्यता आदेशातील सर्व अटीं व शर्तीचे तंतोतत अनुपालन करेल याची वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली हे खात्री करतील व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करतील.
3. वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत केलेले नियम, मार्गदर्शक सूचना व या आदेशातील तसेच केंद्र शासनाचे तत्वतः मान्यता आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.
4. सदर प्रस्तावांतर्गत वृक्षतोड अंतर्भूत आहे.
5. मजुरांचे वास्तव्यासाठी वनक्षेत्रात तात्पुरते शेड उभारता येणार नाही.
6. सदर आदेश केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सूचना क्र. 11-306/2014-FC(pt) दिनांक 28.08.2015 प्रमाणे 1 वर्षापर्यंत वैध राहतील,

**<u>अनुसूची</u>**

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | Compt. No. | सर्व्हे नं. | वैधानिक दर्जा | क्षेत्र (Area in Ha.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कान्हेरी | बोरीवली | मुंबई उपनगर | 11 pt. | 11/pt | Unclassed Forest | 0.0728 |

( डॉ. व्ही. क्लेमेंट बेन )
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
वन्यजीव पश्चिम प्रदेश
मुंबई

प्रति,

Deputy Chief Engineer,(Bridges) Western Suburbs,
Brihanmumbai Municipal Corporation.

**प्रतिलिपी : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीसाठी.**

प्रतिलिपी : जिल्हाधिकारी ठाणे / पालघर यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी : वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

2.00 वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना कळविण्यात येते की, वरील आदेशाची प्रत जिल्हाधिकारी ठाणे / पालघर, जिल्हा परिषद ठाणे / पालघर, स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर व वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी आदेशाची प्रत मिळाल्यापासुन प्रदर्शित केले जातील याची खात्री करावी.

Deputy Chief Engineer,(Bridges) Western Suburbs, Brihanmumbai Municipal Corporation यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुरीचे आदेश सर्व्हे क्रमांक, गट क्रमांक त्यांचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा ई. आणि केंद्र शासनाने तत्वतः मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व शर्ती यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत आणि त्याची प्रत वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली व मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे यांना देण्यात यावी.

स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांनी आदेशाची प्रत मिळाल्यापासून 30 दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावेत.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
वन्यजीव पश्चिम प्रदेश
मुंबई